महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१
दूरध्वनी क्र: ०२२-२२८३ ०२०० Email ID : : soyoj६.rdd-mh@nic.in

---

क्रमांक: विकास-२०२४/प्र.क्र.१९३/ यो-६ दिनांक : २८ मार्च, २०२५.

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व

२) अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सर्व.

**विषय:** लेखाशिर्ष २५१५ १२३८ (मा. लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे) या योजनेंतर्गत विकास कामे मंजूर असलेल्या अनधिकृत/ बनावट शासन निर्णयाबाबत.

**महोदया/ महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, लेखाशिर्ष २५१५ १२३८ (मा.लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामीण भागातील गावांतर्गत मुलभूत सुविधा पुरविणे) या योजनेंतर्गत विकास कामे मंजूर असलेला अनधिकृत/ बनावट शासन निर्णय निर्गमित झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. सबब, उपरोक्त वस्तुस्थिती पाहता भविष्यात अशा अनधिकृत/ बनावट शासन निर्णय/ पत्रांबाबत खबरदारी घेण्यात यावी. अनधिकृत/ बनावट पत्रांवर कोणतीही कार्यवाही होणार नाही याबाबत संबंधित यंत्रणेने दक्षता घ्यावी. लेखाशिर्ष २५१५ १२३८ अंतर्गत प्रशासकीय मान्यता दिलेल्या शासन निर्णयाच्या बाबतीत शासनाच्या अधिकृत ई-मेल आय डी द्वारे (soyoj६.rdd-mh@nic.in) केलेला पत्रव्यवहारच अधिकृत समजण्यात यावा. तसेच एखाद्या शासन निर्णयाच्या बाबतीत शंका असल्यास ग्राम विकास विभागाच्या स्तरावर दुरध्वनीद्वारे संपर्क साधून खात्री करुन घ्यावी. तसेच अशा प्रकरणी कोणीही व्यक्ती जबाबदार असल्यास संबंधिताविरुध्द फौजदारी गुन्हा (FIR) दाखल करण्याची कारवाई करावी, असेही आपणांस कळविण्यात येत आहे.

आपला,

२८/०३/२०२५

(अ.जो. तेलवेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव:-**

१) अतिरिक्त मु.का.अ. (जि.प.), सर्व
२) कार्यकारी अभियंता (सा. बां. वि.), सर्व
३) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
४) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, सर्व